# ***<u>वार्तापत्र</u>***

कार्यालय पोलीस अधिक्षक,
गडचिरोली दि. १५/०८/२०१८

## ***<u>पोलीस अधिक्षक कार्यालयात स्वातंत्रदिन उत्साहात साजरा</u>***

- **<u>पोलीस शौर्यपदक व वेगवर्धित पदोन्नती प्राप्त जवानांचा सत्कार</u>**

आज दिनांक १५ ऑगस्ट २०१८ रोजी भारतीय स्वातंत्र्याच्या ७१ व्या वर्धापनदिनानिमित्य पोलीस मुख्यालय गडचिरोली, पोलीस अधिक्षक कार्यालय गडचिरोली येथे मा. पोलीस अधिक्षक गडचिरोली यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. त्यानंतर राष्ट्रपती शौर्य पदक प्राप्त अधिकारी व कर्मचारी, मा. पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह प्राप्त अधिकारी व कर्मचारी तसेच वेगवर्धित पदोन्नती मिळालेल्या सर्व कर्मचायांना गडचिरोलीचे पोलीस अधिक्षक मा. श्री. शैलेश बलकवडे सा., अप्पर पोलीस अधिक्षक मा. श्री. महेंद्र पंडित सा., अप्पर पोलीस अधिक्षक मा. डॉ. हरी बालाजी सा., अप्पर पोलीस अधिक्षक मा. डॉ. मोहित गर्ग सा., अप्पर पोलीस अधिक्षक मा. श्री. अजयकुमार बन्सल सा., यांनी सन्मानित केले. उपस्थित पोलीस अधिकारी व कर्मचारी, शहीद परीवार या सर्वांना पोलीस अधिक्षक सा गडचिरोली यांनी स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या.

त्याचबरोबर काल दिनांक १४/०८/२०१८ रोजी नक्षलविरोधी अभियाना दरम्यान उत्कृष्ट कामगिरी करणाया अधिकारी व कर्मचारी यांना राष्ट्रपती शौर्य पदक जाहीर झाले. अशा सर्व अधिकारी व कर्मचारी यांना जिल्ह्याचे पालक मंत्री मा. श्री. अम्ब्रीशराजे आत्राम यांनी देखिल मा. जिल्हाधिकारी कार्यालय येथील ध्वजारोहण सोहळ्यानंतर संन्मानित केले. यामध्ये पोउपनि शितलकुमार डोईजड, पोउपनि अजितकुमार पाटील, नापोशि/९३९ प्रभाकर मडावी, नापोशि/१४३९ टिकाराम काटेंगे, पोशि/५४१३ महेश जाकेवार, पोशि/२७१५ राजेंद्र ताडामी, पोशि/२०५४ सोमनाथ पवार या अधिकारी व कर्मचारी यांचा समावेश आहे.

सदर कार्यक्रमाला वरीष्ठ पोलीस अधिकारी, प्रतिष्ठीत नागरिक व पोलीस अधीकारी/ कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

